मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
www.rajdand.com
। पश्चिम महाराष्ट्र ।
follow us : /rajdandlive
२५ वर्षे विश्वासार्हतेची
* सातारा * * दि. २५ मे २०२४

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २७८ * सातारा * सातारा * गुरूवार * दि. २० जून २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/
सातारा



# कांद्याचे भाव पुन्हा ४००० रुपये क्विंटलच्या पार

## शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित!

**मुंबई :** राज्यात लोकसभा निवडणुकीच्या अगोदर कांदा दरात मोठी घसरण पाहायला मिळाली होती. विशेष म्हणजे काही बाजार समित्यांमध्ये कांद्याचे दर हे १ रुपये प्रति किलोपर्यंत घसरले होते. ज्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला होता. मात्र, आता लोकसभा निवडणूक संपताच कांदा दराने पुन्हा ४००० रुपये प्रति क्विंटलचा टप्पा पार केला आहे.

### चालू महिन्यात कांदा दराचा चढता आलेख

**मागील वर्षीच्या नोव्हेंबर महिन्यात कांद्याचे दर सरासरी ४००० रुपये प्रति क्विंटलच्या वरती होते. मात्र, ८ डिसेंबर रोजी केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदी लागू करण्याचा निर्णय घेतला. ज्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्च मिळणे देखील मुश्किल झाले होते. मात्र, आता चालू महिन्याच्या सुरुवातीपासून कांद्याचे काहीसे चढे पाहायला मिळत असून, आता कांदा दराने ४००० रुपये प्रति क्विंटलचा टप्पा पार केला आहे. सध्या राज्यातील जुन्नर, मंचर आणि अमरावती या बाजार समित्यांमध्ये कांद्याला ४००० रुपये प्रति क्विंटलहुन अधिक दर मिळत आहे.**

**या बाजार समित्यांमध्ये मिळतोय ४००० रुपये भाव**

सध्याच्या घडीला राज्यातील जुन्नर बाजार समितीत कांद्याला उच्चांकी ४११० रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे. याशिवाय मंचर बाजार समितीमध्ये देखील कांद्याला ४०१० रुपये प्रति क्विंटल आणि अमरावती बाजार समितीमध्ये देखील कांद्याने ४००० रुपये क्विंटल टप्पा गाठला आहे. तर राज्यातील अन्य सर्वच बाजार समित्यांमध्ये कांद्याला सध्या ३००० ते ३५०० रुपये प्रति क्विंटलहुन अधिक दर मिळत आहे. ज्यामुळे आता कांदा दरात वाढ झाल्याने उन्हाळी कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

**काय आहे शेतकऱ्यांची मागणी?**

दरम्यान, मोठ्या अवधीनंतर कांद्याच्या दराने उसळी घेतली आहे. राज्यातील उन्हाळी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आपला कांदा चाळींमध्ये साठवून ठेवला आहे. ज्यामुळे सध्या कांद्याच्या दरात वाढ झाल्याने केंद्र सरकारने आता यामध्ये कोणताही हस्तक्षेप करू नये. शेतकऱ्यांना आर्थिक फायदा मिळत असताना निर्यातबंदी सारखा निर्णय घेऊ नये, अशीच आशा कांदा उत्पादक शेतकरी करत आहेत.



# विधान परिषदेच्या ११ जागांसाठी चुरशीची निवडणूक

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर आता विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर जागांसाठी येत्या २७ जूनला मतदान होणार आहे. त्यानंतर विधान परिषदेच्या रिक्त होणा-या ११ जागांसाठी येत्या दि १२ जूलैला निवडणूक होणार आहे. लोकसभा निकालानंतर सर्वच राजकीय पक्षांच्या आमदारांमध्ये चलबिचल सुरू झाली आहे. त्यामुळे आमदारांच्या मतांच्या फाटाफुटीचा धोका सर्वच पक्षांना असल्याने विधान परिषदेच्या ११ जागांची निवडणूक चांगलीच चुरशीची ठरणार आहे.

लोकसभेच्या ४८ जागांपैकी काँग्रेस १३, ठाकरेंच्या शिवसेनेला १०, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार ८ तर भाजप ९, शिंदे सेनेला ७, राष्ट्रवादी अजित पवार १ अशा जागा मिळवल्या आहेत. मागील वेळेस २३ जागा पटकावणा-या भाजपला अवघ्या ९ जागांवर विजय मिळवता आला आहे. त्यामुळे १४ जागांवर भाजपचा दारूण पराभव झाला आहे. राज्यात महाविकास आघाडीला १५० पेक्षा अधिक विधानसभा मतदारसंघांतून आघाडी मिळाली आहे. लोकसभा निकालानंतर शिवसेना आणि राष्ट्रवादीतील बंडखोर आमदार आमच्या संपर्कात असल्याचा दावा मूळ राष्ट्रवादी वा शिवसेनेकडून करण्यात येत आहे. अवघ्या तीन महिन्यांवर विधानसभेची निवडणूक येऊन ठेपल्याने महायुतीतील आमदारांमध्ये चलबिचल सुरू झाली आहे.

विधान परिषदेसाठी गुप्त मतदान असते. विधानसभेसाठी आपली उमेदवारी पक्की करण्याकरिता बंडाच्या पवित्र्यात असलेले आमदार पक्षाच्या विरोधात मतदान करू शकतात असा धोका समजला जात आहे. याबरोबरच काँग्रेस, ठाकरे गट आणि शरद पवार गटाच्या आमदारांना गळाला लावण्याचे प्रयत्न महायुतीकडून होऊ शकतात. यामुळेच भाजप, काँग्रेस, शिवसेना ठाकरे व शिंदे गट, राष्ट्रवादीतील शरद पवार आणि अजित पवार गट यापैकी कोणत्याही पक्षांचे आमदार विरोधी मतदान करू शकतात. विधानसभा निवडणुकीपूर्वी ही अखेरची संधी असल्याने घोडेबाजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मतांची फाटाफूट किती होते यावरच महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांचे भवितव्य ठरणार आहे.

विधानसभेच्या १४ जागा रिक्त झाल्या आहेत. यापैकी १० जागा या आमदारांच्या राजीनाम्यामुळे रिक्त आहेत. चार जागा या आमदारांच्या निधनाने रिक्त आहेत. परिणामी २७४ सदस्यांमधून ११ उमेदवार निवडून द्यायचे आहेत. जागा कमी झाल्याने निवडून येण्यासाठी उमेदवाराला पहिल्या पसंतीच्या २३ मतांची आवश्यकता असेल. त्यामुळे या निवडणुकीत काय घडतयं याकडे लक्ष वेधलय.

२५ जून रोजी या ११ जागांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रकिया सुरू होणार आहे. तर दि २ जुलै उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असणार आहे. अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३ जुलै रोजी अर्जांची छाननी केली जाणार आहे. तसेच अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख ५ जुलै रोजी आहे. तर प्रत्यक्ष मतदान हे १२ जुलै रोजी होणार आहे.

# मोदी कॅबिनेटची मंजुरी



**दिल्ली :** लोकसभा निवडणुकीत शेतकऱ्यांच्या रोषाने मोदी सरकारला बहुमताचा झटका दिल्यानंतर केंद्र सरकारने आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत महत्वाचा निर्णय घेतला आहे. कॅबिनेटने १४ खरीप पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ करण्यास मंजुरी दिली आहे. उत्पादकांना त्यांनी काढलेल्या योग्य उत्पादनाची किंमत ठरविता येईल म्हणून एमएसपीमध्ये वाढ केल्याचेसांगण्यातआले.

तेलबिया आणि कडधान्यांसाठी एमएसपीमध्ये सर्वाधिक वाढ करण्यात आली आहे. नायजरसीड (रामतील) प्रति क्विंटल ९८३ रुपयांनी वाढले आहे, त्यानंतर तीळ ६३२ रुपये प्रति क्विंटल आणि अरहर

## कापूस, तूरडाळीसह १४ कृषी उत्पादनांच्या एमएसपीत मोठी वाढ

डाळ ५५० रुपये प्रति क्विंटलने एमएसपी वाढली आहे. शेतकऱ्यांना एमएसपी म्हणून सुमारे २ लाख कोटी रुपये मिळतील. गेल्या हंगामापेक्षा हे ३५,००० कोटी रुपयांनी अधिक आहे, असे केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले. धानाचा एमएसपी २३०० रुपये प्रति क्विंटल करण्यात आला असून तो गेल्या वर्षीपेक्षा ११७ रुपये जास्त आहे. तूर डाळीची एमएसपी ७५५० रुपये प्रति क्विंटल करण्यात आली असून ती ५५० रुपयांनी वाढविण्यात आली आहे. उडीद डाळीचा एमएसपी ७४०० रुपये प्रति क्विंटल करण्यात आली असून ४५० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. मुगाची एमएसपी १२४ रुपयांनी वाढविण्यात आली आहे, आता ही ८६८२ रुपये प्रति क्विंटल करण्यात आली आहे.

# बारामती विधानसभेसाठी युगेंद्र पवार यांच्या नावावर शिक्कमोर्तब!

## शरद पवार यांच्याकडून अप्रत्यक्ष संकेत



**बारामती :** आगामी विधानसभा निवडणुकीसाठी बारामती मतदारसंघातून उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र पवार यांना उमेदवारी देण्यासंदर्भातील अप्रत्यक्ष स्पष्ट संकेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बोलताना दिले.

बारामती तालुक्यातील सांगवी व माळेगाव येथील कार्यक्रमांमध्ये शरद पवार यांनी अप्रत्यक्षरीत्या हे संकेत दिले. लोकसभा निवडणूक निकालानंतर शरद पवार सलग तीन दिवस बारामती तालुक्यातील विविध महत्त्वाच्या गावांमधील दौऱ्यात आहेत. सांगवी या ठिकाणी ग्रामस्थांशी त्यांनी संवाद साधला. यावेळी पवार म्हणाले, निवडणूकीत काही लोकांचा विरोध खूप झाला, विरोध झाला, हे विसरून जायचं. लक्षात ठेवायचं नाही. सुडाचं राजकारण आपण कधी करत नाही. लोकसभा निवडणूकीत गावच्या नेत्यांचं दुकान कधी चाललं नाही, मात्र सामान्य माणसं, कष्टकरी, शेतकरी, कामगार या लोकांचं दुकान जोरात चाललं, त्यामुळं नवी तरुण पिढी पुढं आली. त्यामुळं या तरुण पिढीच्या माध्यमातून गावातील लोकांचे प्रश्न कसे सुटतील,याकडे ४लक्ष देणं , ही आम्हा लोकांची जबाबदारी आहे. या तरुण पिढीच्या माध्यमातून ज्यांनी पुढाकार घेतला,त्यांच्या पाठीशी राहून त्यांच्याकडून सर्व गोष्टी करून घेण्याची जबाबदारी आम्हा लोकांची राहील, असे आश्वासन पवार यांनी यावेळी देत तू गेंद्र पवार यांच्या विधानसभा निवडणुकीच्या संभाव्य उमेदवारी संदर्भात अप्रत्यक्ष संकेत दिले. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी टाळ्याच्या गजरात शरद पवार यांच्या या वक्तव्याचे स्वागत केले.

याच दिवशी माळेगाव या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात बारामती विधानसभा मतदारसंघांमध्ये युगेंद्र पवार यांना उमेदवारी द्यावी अशी घोषणाबाजी उपस्थित कार्यकर्त्यांनी केली. यावेळी शरद पवार यांनी उपस्थितांना उद्देशून तुमच्या मनातील उमेदवार नक्की मी देईल, असे आश्वासन दिल्याने उपस्थित त्यांनी टाळ्याच्या कडकडाटात स्वागत केले.

## राज्यशास्त्राच्या पाठ्यपुस्तकात राजकीय पक्षपात

**मुंबई:** राष्ट्रीय शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषदेने नव्याने प्रसिद्ध केलेल्या पाठ्यपुस्तकात विशिष्ट राजकीय विचारसरणीचा पुरस्कार केला असून अशा पुस्तकात करण्यात आलेला आपला नामोल्लेख त्वरित काढून टाकण्यात यावा. ही सर्व पुस्तके बाजारपेठेतून मागे घेण्यात यावी, अन्यथा आपण न्यायालयात परिषदेविरोधात खटला दाखल करू, असा इशारा राजकीय विश्लेषक योगेंद्र यादव आणि सुहास पळशीकर यांनी दिला आहे.

योगेंद्र यादव आणि सुहास पळशीकर हे एनसीईआरटीचे राज्यशास्त्राच्या पाठ्यपुस्तकांसाठी प्रमुख सल्लागार आहेत. मात्र, त्यांनीच नव्याने प्रसिद्ध केलेली राज्यशास्त्राची पाठ्यपुस्तके विशिष्ट राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोप केला आहे. या पाठ्यपुस्तकांमध्ये अर्थातच मुख्य सल्लागार म्हणून या दोन्ही राजकीय विश्लेषकांचा नामोल्लेख करण्यात आला आहे. हा नमुलेख आपल्या सहमतीशिवाय करण्यात आल्याचा आक्षेप या दोघांनीही घेतला आहे.




## संपादकीय

# जी-७ चे फलित

तिसऱ्यांदा भारताच्या पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर लगेच जी-७ देशांच्या शिखर परिषदेसाठी नरेंद्र मोदी यांना उपस्थिती लावावी लागली. दक्षिण आशियातून फक्त भारताला या परिषदेचे निमंत्रण होते, यावरून भारताचे जागतिक महत्त्व लक्षात यायला हरकत नाही. त्यातही अन्य सहा देशांचे नेते त्यांच्या त्यांच्या देशात अडचणीत आले असताना मोदी यांनी मात्र तिसऱ्यांदा सत्ता मिळवल्याने यजमान इटली आणि भारत या दोन देशांचे नेतेच खऱ्या अर्थाने शक्तीशाली होते. त्यातही मोदी यांच्या तिथे जाण्यापूर्वीच यजमान देशाच्या पंतप्रधान भारतीय पद्धतीने नमस्कार करून पाहुण्यांचे स्वागत करीत होत्या, यावरून भारताचा जागतिक प्रभाव समजतो. ही परिषद भारत-पश्चिम-युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर (आयएमईसी) सारख्या ठोस पायाभूत सुविधांच्या प्रस्तावांना प्रोत्साहन देण्यासाठी वचनबद्ध आहे. जी-७ सातच्या गटात अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, इटली, जर्मनी, जपान आणि कॅनडा या देशांचा समावेश आहे. भारत या गटाचा सदस्य नाही, तरीही भारताला वारंवार या परिषदेची निमंत्रणे येत असतात. तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर मोदी यांचा हा पहिलाच विदेश दौरा होता. या दौऱ्यात त्यांनी अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन, जपानचे पंतप्रधान फुमियो किशिदा आणि कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांच्यासह अनेक जागतिक नेत्यांची भेट घेतली. रशिया १९९८ मध्ये जी - ७ गटात सामील झाला, त्यानंतर त्याला जी-८ म्हटले गेले; मात्र २०१४ मध्ये रशियाने क्रिमियावर कब्जा केल्यानंतर रशियाला या गटातून बाहेर काढण्यात आले. जागतिक नाणेनिधीच्या आकडेवारीनुसार, जगातील जी-७ श्रीमंत देशांच्या गटामध्ये अमेरिका पहिल्या स्थानावर आहे. तिचा जीडीपी २८ हजार ७८३ अब्ज अमेरिकन डॉलर आहे. यानंतर जर्मनीचा जीडीपी चार हजार ५९० अब्ज डॉलर, जपान चार हजार ११२ अब्ज डॉलर, ब्रिटनचा तीन हजार ५०२ अब्ज डॉलर, फ्रान्स तीन हजार१३२ अब्ज डॉलर, इटलीचा दोन हजार ३३२ अब्ज डॉलर, कॅनडाचा दोन हजार २४२ अब्ज डॉलर आहे. या सात देशांच्या जवळपास भारत कुठेही नसताना त्याला का बोलावले जाते, असा प्रश्न पडणे स्वाभावीक आहे. दरडोई उत्पन्नात भारत भलेही मागे असेल; परंतु भारताची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश आता भारत आहे. त्याची अर्थव्यवस्था वेगवान आहे. जगातील सर्वांत मोठ्या बाजारपेठेकडे आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्थेकडे कुणालाही दुर्लक्षून चालणार नाही. २०१९ आणि २०२० मध्येही मोदी यांना आमंत्रित करण्यात आले होते. २०२३ मध्ये जपानच्या हिरोशिमा येथे झालेल्या परिषदेत मोदी सहभागी झाले होते. भारत ही जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. जागतिक मंदीच्या काळात गेल्या तीन वर्षांत भारताचा विकास दर सात टक्क्यांपेक्षा जास्त आहे.

या परिषदेत मोदी म्हणाले, की २०४७ पर्यंत विकसित भारत करण्याचा आमचा संकल्प आहे. समाजातील कोणताही घटक मागे राहू नये ही आमची बांधिलकी आहे. आम्ही ग्लोबल इन्फ्रास्ट्रक्चर आणि गुंतवणुकीसाठी भागीदारीच्या पूरक प्रस्तावांना प्रोत्साहन देऊ. त्यामुळे दर्जेदार पायाभूत सुविधा आणि गुंतवणुकीसाठी परिवर्तनशील आर्थिक कॉरिडॉर विकसित होईल. भारत-पश्चिम आशिया-युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर तसेच युरोपीय महासंघ ग्लोबल गेटवे, ग्रेट ग्रीन वॉल इनिशिएटिव्ह आणि आफ्रिकेसाठी इटलीने सुरू केलेल्या मॅटी योजनेसाठी समन्वय आणि वित्तपुरवठा करणे आवश्यक आहे. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी या परिषदेने घेतलेले निर्णय अतिशय महत्त्वाचे आहेत. चीनच्या कुटील डावपेचांचा पर्दाफाश करत चीनविरोधात दोन ठराव मंजूर करण्यात आले आहेत. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, जपान, इटली आणि कॅनडासह जी-७ नेत्यांनी रशियाला निर्बंध टाळण्यास आणि फसव्या पद्धतीने तेलाची वाहतूक करण्यास मदत करणाऱ्या चिनी संस्थांवर निर्बंध लादण्याचे आश्वासन दिले आहे. ज्या चिनी कंपन्यांनी युक्रेनच्या विरोधात रशियाला मदत केली आहे, त्यांच्यावर कठोर निर्बंध लादले जातील, असे जी-७ देशांनी जाहीर केले. अशा कंपन्यांवर जी-७ देशांच्या आर्थिक प्रणालीतून बंदी घातली जाईल. जी-७ देशांनी चीनच्या चुकीच्या व्यावसायिक कारवायांवर कारवाई करण्याचा संकल्प केला आहे. या काळात चीनसोबतची व्यापारी तूट कमी करण्यावरही भर देण्यात आला. यासोबतच चीनला निर्यात नियंत्रणातून पुरवठ्यावर परिणाम करण्यापासून परावृत्त करण्याचा इशारा देण्यात आला आहे. जी-७ देशांनी चिप्स आणि इलेक्ट्रॉनिक्सच्या निर्मितीमध्ये वापरल्या जाणाऱ्या खनिजांवर एकतर्फी निर्यात निर्बंध अयोग्य असल्याचे म्हटले आहे. चीनच्या कुटील हालचालींपासून त्यांच्या व्यवसायांचे संरक्षण करण्याबद्दल आणि चीनसोबत व्यापार संतुलन राखण्याबाबत जी-७ देशांनी चर्चा केली. भारत आणि कॅनडा यांच्यातील संबंध गेल्या काही महिन्यांपासून तणावाचे आहेत. या पार्श्वभूमीवर इटलीत मोदी आणि कॅनडाचे जस्टीन ट्रुडो यांच्यात झालेल्या चर्चेनंतर संबंध पूर्वपदावर येतील अशी आशा करायला हरकत नाही. हरदीप सिंग निज्जर यांच्या हत्येनंतर आणि ट्रूडो यांनी खलिस्तानींना पाठिंबा दिल्यानंतर भारत आणि कॅनडाचे संबंध बिघडले. दोन्ही देशांनी वेगवेगळ्या व्यासपीठांवर परस्परविरोधी भावना व्यक्त केल्या आहेत;परंतु आता असे दिसते, की दोन्ही देशांमधील वाढती कटुता कमी होत आहे. मोदी आणि ट्रुडो यांची इटलीमधील जी-७ शिखर परिषदेत भेट झाली. मोदी यांच्या भेटीनंतर ट्रुडो यांची वृत्ती मवाळ झाली आहे. महत्त्वाच्या मुद्द्यांवर एकत्र काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. जी-७ शिखर परिषदेत मोदी यांची भेट घेतल्यानंतर ट्रुडो यांना याबाबत प्रश्न विचारले असता ते अत्यंत सावध दिसले. निज्जर यांच्याबाबत प्रश्न विचारला असता त्यांनी ते टाळले. गोलमेज बैठकीत जगभरातील अनेक मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. त्यात पर्यावरण, कुपोषण, महामारी, जागतिक अस्थिरता, कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या मुद्द्यांचा समावेश होता. या प्रश्नांवर सखोल चर्चा झाली. या वेळी मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्यासह अनेक बडे नेते उपस्थित होते. यासोबतच आफ्रिकन देशांमध्ये गुंतवणूक करण्याच्या योजनांवरही चर्चा झाली. इटलीमध्ये दोन दिवसीय शिखर परिषदेच्या शेवटच्या दिवशी, जगातील सात विकसित देशांच्या गटाने महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली. या परिषदेत उपस्थित नेत्यांनीही जागतिक आव्हानांना तोंड देण्याची तयारी दाखवली.

# पुरोगामी महाराष्ट्राचे गतवैभव परत आणण्यासाठी जातनिहाय जनगणना करावी. : वडेट्टीवार



**मुंबई :** महायुती सरकारने दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे महापाप केले आहे. पुरोगामी महाराष्ट्राचे गतवैभव परत आणण्यासाठी व दोन्ही समाजाचे समाधान होण्यासाठी राष्ट्रीय नेते राहुलजी गांधी यांच्या मागणीप्रमाणे सरकारने जातनिहाय जनगणना करावी, केंद्र सरकारने नीट परीक्षेबाबत एसआयटी गठीत करून झालेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करावी,केंद्र सरकारने नीट परीक्षेबाबत एसआयटी गठीत करून झालेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करावी अशी आग्रही मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते श्री. विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. मुंबईमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत . वडेट्टीवार बोलत होते.

वडेट्टीवार म्हणाले की , राज्यभरात बुधवारपासून पोलीस भरती सुरू होणार आहे. १७ हजार जागांसाठी १७ लाखहून अधिक अर्ज आले आहेत. ही पोलीस भरती अनेक वर्षांनी होत आहे. त्यामुळे उमेदवारांची संख्या प्रचंड आहे. मात्र एका उमेदवाराला पाच ठिकाणी अर्ज करण्याचा पर्याय दिल्याने उमेदवार कसे उपस्थित राहतील, याचे सरकारला भान असले पाहिजे .काही ठिकाणी उन्हाचा तडाखा आहे तर काही ठिकाणी पाऊस आहे. याचा फटका पोलीस भरतीतील उमेदवारांना बसू नये. याची खबरदारी सरकारने घ्यावी.भरती प्रक्रीया होणाऱ्या ठिकाणी आवश्यक सोयी सुविधा द्याव्यात. वैद्यकिय सुविधा, ऊन पावसापासून बचाव करणे अशा बाबींची सरकारने काळजी घ्यावी. दोन जिल्ह्यातील भरतीत अंतर ठेवावे अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, दरवर्षी नीट परीक्षेला देशभारातून २५ लाख विद्यार्थी बसतात. डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगून विद्यार्थी दिवस रात्र मेहनत करत असतात. यावेळी पहिल्यांदा देशातील ६७ विद्यार्थी ७२० पैकी ७२० गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. गुजरातच्या गोध्रा शहरातील जय जलाराम स्कूल या शाळेमधील 'नीट' परीक्षेचे केंद्र मिळवण्यासाठी तर तब्बल १० लाख रुपयांची बोली लागली होती.गुजरातप्रमाणे हरियाणा आणि बिहार मधील घोटाळ्यामध्ये पोलीसांनी कारवाई केली आहे.त्याप्रमाणे महाराष्ट्रातही कारवाई करण्यात यावी. केंद्र सरकारने या बाबतीत एसआयटी गठीत करून झालेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करावी. यातील दोषींविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी.अशी मागणी त्यांनी केली. नीट परीक्षा ही खासगी क्लासेस चालवणारे आणि वैद्यकिय महाविद्यालयात प्रवेश मिळवून देणाऱ्या दलालांच्या हातात गेली आहे का असा सवाल उपस्थित करत महाराष्ट्रात चंद्रपूर, नांदेड मध्ये नीट विरोधात आंदोलने होत आहेत त्याची सरकारने दखल घ्यावी अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

ओबीसींच्या आरक्षणासाठी लक्ष्मण हाके आंदोलन करत आहेत याविषयी बोलताना श्री. वडेट्टीवार म्हणाले की, मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठींबा होता तसाच लक्ष्मण हाके यांच्या आंदोलनाला आमचा पाठिंबा आहे. ओबीसी आरक्षणाबाबत सरकारने लेखी आश्वासन द्यावे अशी लक्ष्मण हाके यांची मागणी आहे. याबाबत सरकारने सकारात्मक भूमीका घ्यावी.महायुती सरकारने दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे महापाप केले आहे. मराठवाड्यात सरकारी धोरणांमुळे ओबीसी विरुद्ध मराठा वाद हा विकोपाला गेला. दुहीचे राजकारण करणाऱ्या सरकारने यावर तोडगा काढावा.

# विनाकारण बदनामी करू नका..

## खासदार रवींद्र वायकर यांचा संजय राऊतांना इशारा

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत सुमारे साडेचार लाख लोकांनी मतदान करून कायदेशीररित्या निवडून दिले. निवडणूक आयोगाने दिलेल्या निकालाविरोधात कोणतीही भूमिका घ्या, त्याबद्दल काहीही भाष्य करणार नाही. परंतु, विनाकारण माझी बदनामी करू नका, असे खडे बोल खासदार रवींद्र वायकर यांनी खासदार संजय राऊत यांना सुनावले. खोटा प्रचार थांबवा, असा इशाराही वायकर यांनी यावेळी दिला. वायकर दगाबाजी करून निवडून आले आहेत. नैतिकतेच्या आधारे त्यांनी



खासदारकीची शपथ घेऊ नये, असे संजय राऊत यांनी ठणकावले होते. वायकर यांनी त्याला जोरदार प्रत्युत्तर दिले. मंगळवारी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतल्यानंतर प्रसारमाध्यमांशी त्यांनी संवाद साधला.

शिवसेनेकडून ज्यावेळी उमेदवारी जाहीर झाली तेव्हा राज ठाकरेकडून पाठिंब्यासाठी भेट घेतली होती. आता निवडणुकीत विजय झाला. मनसेच्या कार्यकर्त्यांचा आणि पदाधिकाऱ्यांचे त्यात मोठे सहकार्य लाभले. या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानण्यासाठी राज यांना भेटलो. दरम्यान, वादात सापडलेल्या निकालावर भाष्य केले. वायकर म्हणाले की, मतमोजणीनंतर अमोल किर्तीकर यांची माफी मागितली. परंतु, विनाकारण मला लक्ष्य करून माझ्या विरोधात नकारात्मक वातावरण तयार केले जात आहे.

माजी खासदार गजानन किर्तीकर यांनी देखील विरोधात भूमिका घेतली. मात्र, कामाच्या जोरावर मी विजयी झालो आहे. विरोधकांनी आता जय पराजय मोठेपणाने पचवायला शिकायला हवे, असे आवाहन वायकर यांनी केले. तसेच खासदारकीची शपथ म्हणजे ही काही आई-वडिलांची किंवा देवाची शपथ नाही, असा टोला त्यांनी लगावला. मी अल्कोहोलिक नाही वर्काहोलिक आहे, असा टोला देखील रवींद्र वायकर यांनी लगावला आहे.

मशीन हॅक केल्याच्या आरोपावरून ही टीकास्त्र सोडले. मतमोजणी ठिकाणी मोबाईल घेऊन केल्याचा

# देऊळगाव राजेत ५२० किलो गोमांस पकडले

**देऊळगाव राजे :** दौंड तालुक्याच्या पूर्व भागात दि.१८ रोजी चार चाकी वाहनांमध्ये स्थानिक ग्रामस्थांनी गोमांस पकडले ,

याबाबत सविस्तर माहिती अशी की पहाटेच्या सुमारास देऊळगाव राजे येथील स्थानिक ग्रामस्थ दौंड सिद्धटेक रस्त्यावर मॉर्निंग वॉक साठी चाललेले असताना रस्त्याच्या कडेला दौंडच्या दिशेने उभी असलेली चक १२ णत्र ८५८७ या क्रमांकाची मारुती सुझुकी बलेनो चार चाकी वाहन ग्रामस्थांना टायर फुटला म्हणून उभी असलेली दिसली, त्या गाडीतून रस्त्यावरती रक्त सांडलेले दिसत होते हे ग्रामस्थांनी पाहिल्यानंतर वाहनाच्या चालकाने टायर फुटलेला असताना सुद्धा तेथून गाडी चालू करून आर्वी फाटा येथील एका शेतकऱ्याच्या शेताच्या कडेला वाहन उभे केले तोच ग्रामस्थांनी याबाबतची खबर देऊळगाव राजे येथील पोलीस पाटील सचिन पोळ यांना दिली त्यानंतर त्यांनी याबाबत चा सर्व प्रकार दौंड पोलीस स्टेशनला कळविला त्यानंतर दौंड पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी आल्यानंतर सदर कारची तपासणी केल्यानंतर कारच्या मागील सीटा वरती गोमास झाकून ठेवल्याचे निदर्शनास आले सदर गोमांस ५२० किलो वजनाचे आहे ते राशीन वरून दौंडकडे चालले होते.

## संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळ्यातील

# वारकरी भक्तांना सुविधा सुव्यवस्था मिळव्यात!

## श्रीक्षेत्र देहू येथील आढावा बैठकीत हवेली तहसीलदार, जयराज देशमुख यांच्या सूचना

**पिंपरी चिंचवड** '': भारताच्या महाराष्ट्राच्या इतर परराज्यातून कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांना जगद्गुरु संत तुकाराम महाराज ३३९ व्या आषाढी पायी वारी सोहळा अवघ्या नऊ दिवसांवर येऊन ठेपला आहे. या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या लाखो वारकरी भक्तांना विविध सोयी सुविधा मिळाव्यात आणि त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने, सर्वत्र स्वच्छता ,शुद्ध पिण्याचे पाणी ,अखंडीत विद्युत पुरवठा , निवारा , वैदयकीय सेवा ,वाहतूक व्यवस्था ,कायदा व सुव्यवस्था आदी विभागांनी योग्य पद्धतीच्या नियोजनाचा आखाडा तयार करावा.त्यासाठी प्रत्येक विभागाने एक नोडल अधिकारी नेमून या नोडल अधिकाऱ्यांसह महत्वाच्या अधिकाऱ्यांचा एक व्हॉट्सअप ग्रुप बनवावा.त्यावर प्रत्येक अडचणी आणि समस्यांची माहिती टाकावी ,जेणे करून तत्काळ त्या अडचणी सोडविता येतील अशा सूचना पिंपरी चिंचवडचे तहसिलदार जयराज देशमुख यांनी दिल्या.

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या ३३९ व्या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर देहूतील भक्ती निवास मध्ये अप्पर तहसीलदार जयराज देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार ( ता.१८) रोजी आढावा बैठक घेण्यात आली.या बैठकीत देशमुख यांनी वरील सूचना दिल्या. तसेच अनगडशहा बाबा दर्ग्याजवळ मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते



,त्या बाबत योग्य ते पोलिसांनी नियोजन करावे.या बैठकीस संत तुकाराम महाराज देवस्थान संस्थानचे अध्यक्ष पुरूषोत्तम महाराज मोरे,पालखी सोहळा प्रमुख माणिक महाराज मोरे,संतोष मोरे ,विशाल महाराज मोरे ,विश्वस्त भानुदास महाराज मोरे,नायब तहसीलदार प्रवीण ढमाले ,मुख्याधिकारी निवेदिता घार्गे, नगराध्यक्षा पूजा दिवटे, जयश मोरे,देहूरोड कॅन्टोमेंट बोर्डाचे कार्यालयीन अधीक्षक लक्ष्मण तनपुरे , पीएमपीएल आगार प्रमुख भास्कर दहातोंडे ,वैद्यकीय अधिकारी डॉ.किशोर यादव ,देहूरोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय वाघमारे, वाहतूक विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप जमदाडे ,एसआयटी च्या सहाय्यक पोलीस आयुक्त श्रेया उबाळे ,पोलीस उपनिरीक्षक अतुल वसेकर ,मंडल अधिकारी दीपक नरवडे ,तलाठी सूर्यकांत काळे, येलवाडी ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका पूनम शेवाळे,महावितरणचे अतिरिक्त अभियंता एस.एस.हंचाटे ,सहाय्यक अभियंता एस.बी.झोडगे ,नगरसेवक प्रवीण काळोखे,योगेश परंडवाल,प्रवीण काळोखे,योगेश काळोखे, मयूर शिवशरण, पोलीस पाटील चंद्रसेन टिळेकर, सुभाष चव्हाण आदी उपस्थित होते.

**देहूनगर पंचायत ऍक्टिव्ह मुडवर**

देहूनगर पंचायतीच्या वतीने इंद्रायणी नदीपात्रातील जलपर्णी काढण्याचे काम सुरू असून मंदिर ,घाट व परिसर स्वच्छ करण्यासाठी २५ तर मुख्य मंदिर व मंदिराचा परिसर स्वच्छ करण्यासाठी ५ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.पथदिवे दुरुस्ती व साफसफाईचे काम चालू करण्यात आले आहे.

पाण्याच्या टँकरची १२ ठिकाणी व्यवस्था करण्यात आली असून ११०० फिरत्या शौचालयांची व्यवस्था करण्यात येणार आहे.विद्युत पुरवठा खंडीत होऊ नये यासाठी दुय्यम फिडरची व्यवस्था करण्यात आली आहे.तिन्ही पाळीत कर्मचारी उपलब्ध असणार आहेत. निवेदिता घार्गे, मिख्याधिकारी देहूनगर पंचायत

गायरणा जमिनीवर शेकडो दिंड्या मुक्कामी असतात.त्यांना त्यांना विद्युत पुरवठा करण्यात यावा ,पिण्याच्या पाण्यासाठी टँकर उपलब्ध करून द्यावेत,पावसाळ्याचे दिवस असल्याने दिंड्याच्या निवासाची सोय शाळेमध्ये करण्यात यावी. बाह्यरुग्ण तपासणी व उपचार केंद्र -४ , रुग्णवाहिका -४ ,कार्डियक रुगबवाहिका-१ ,पुरेसा औषधांचा साठा,पाणी मिर्जंतुकीकरण करण्यासाठी मेडीक्लोर आणि अतिरिक्त कर्मचारी आसनावर आहेत.उपहार गृह स्वीटहोम ,तसेच खाद्य पदार्थांच्या दुकानांची वारंवार तपासणी करण्यात येणार आहे.

# पाचवी ते इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा गेट टूगेदर उत्साहात

**भोर** - भोर शहरातील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, सन १९९२ ते १९९७ मधील इयत्ता पाचवी ते इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा गेट टूगेदर कार्यक्रम उत्साहात पार पडला. इयत्ता पाचवीपासून ते इयत्ता दहावीपर्यंत एकाच तुकडीमध्ये शैक्षणिक प्रवास करणारे वर्गमित्र, मैत्रीण दहावीनंतर २७ वर्षांनी एकत्र येऊन गेट टुगेदरच्या निमित्ताने भेटले.

यावेळी महेश रावळ, राहूल दिघे, अशोक शिरवले, सुदर्शन जाधव, अमोल खोपडे, सचिन शिंदे, परवेज महात, प्रकाश गाटे, राजेंद्र सणस, संदीप मरगजे, तुषार घोणे, सागर दिघे,नीलेश घोणे, दीपक शेटे, विशाल शिवतरे, गणेश कदम, सचिन शिवतरे, गणेश पवार, महेश राचट्टे, शैलेंद्र पाटील, केशव साळेकर, प्रसाद महाजन, प्रमिला वीर,वनिता जाधव, हेमलता उमरदंड, रिना प्रधान, विद्या खराटे, माया वीर, सारिका बोरकर, आदी माजी विद्यार्थी उपस्थित होते.

या बॅचचे गेट-टुगेदरबाबतचे कार्यक्रम नियोजन प्रसाद महाजन व राहुल दिघे या मित्रांनी पूर्ण केले. शाळेमध्ये एकत्र आल्यानंतर सर्वप्रथम त्यांनी शाळेची पाहणी केली. ज्या ज्या वर्गात ते शिकले, त्या वर्गांना त्यांनी भेटी दिल्या.सर्वांत शेवटी इयत्ता दहावीच्या वर्गामध्ये बसून सर्व आठवणींना उजाळा दिला.

आठवणीतून मनोगत

वर्गामध्ये बसल्यानंतर इयत्ता पाचवीपासून कॉशिक्षक ते विषयशिक्षक असे इयत्ता दहावीपर्यंत वर्गशिक्षक सर्व विषयशिक्षक यांच्या आठवणी डोळ्यांपुढे येऊ लागल्या. प्रत्येकजण शिक्षकांची आठवण व चांगली शाळेची प्रतिमा व्यक्त करू लागला. या गेट- टूगेदर साठी मुंबई, गोवा, पुणे, चिंचवड, सातारा, लातूर या भागातून विद्यार्थी-विद्यार्थिनी आले होते.

# वाघजाई मंदिरा समोर रस्ता खचला..

**भोर** - भोर महाड रस्त्यावरील वरंधा घाटात वाघजाई मंदिरासमोरच दरीच्या बाजूला रस्त्याच्या कठड्याचा काही भाग बुधवार (दि.१९) वरंधा घाट रस्ता अवजड वाहतुकीसाठी धोकादायक बनला आहे. वरंधाघाट (ता.भोर) रस्त्यावर दोन दिवसांपासून रिमझिम पाऊस सुरू असून धुके मोठ्या प्रमाणावर आहे. सध्या पाऊसाने जोर धरला नसताना देखील रिमझिम पावसात रस्त्याचा काही भाग खोल दरीच्या बाजूला खचला गेला आहे. ऐन पावसाळ्यात या रस्त्याची बिकट परिस्थिती होण्याची चिन्हे आहेत.

# अयोध्येतील राम मंदिराच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या जवानाला गोळी लागून मृत्यू

**दिल्ली :** उत्तर प्रदेशातील अयोध्येत राम मंदिराच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या एसएसएफ (डडञ) जवानाचा गोळी लागून मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. ही घटना बुधवारी (१९ जून) पहाटे ५.२५ वाजता समोर आली आहे. शत्रुघ्न विश्वकर्मा असे या सैनिकाचे नाव होते.

२५ वर्षीय शत्रुघ्न हे आंबेडकर नगर येथील रहिवासी होता. सकाळी राममंदिर परिसरात गोळीबाराचा आवाज ऐकून सुरक्षा कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यावेळी त्यांना शत्रुघ्न रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसले. सहकारी सैनिकांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. जखमी जवानाला ट्रॉमा सेंटरमध्ये रेफर करण्यात आले. मात्र उपचारादरम्यांन डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या जवानाच्या मृत्यूने अयोध्या मंदिर परिसरात खळबळ उडाली आहे. आयजी आणि एसएसपी घटनास्थळी पोहोचले असून त्यांनी स्वत: घटनास्थळाची पाहणी केली. फॉरेन्सिक टीमनेही घटनास्थळी पोहोचून तपास केला. प्राथमिक तपासात हे आत्महत्येचे प्रकरण मानले जात आहे. सध्या मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी पाठवण्यात आला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# परवानगीशिवाय राजकीय भाष्य न करण्याची मिटकरी यांना तंबी



**मुंबई :** महायुतीत अजित पवार यांना सामावून घेण्याबाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नाराजी आणि त्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून व्यक्त होणारे प्रतिक्रिया, यामुळे महायुतीत बेपनाह वाढत असल्याची चर्चा सुरू आहे. यांनी तर, अजित पवार यांना लक्ष करण्यात येत असेल तर वेगळा विचार करावा लागेल, असा टोकाचा इशारा भारतीय जनता पक्षाला दिला आहे. त्याची दखल घेऊन, मिटकरी यांनी पक्षाध्यक्षांच्या संमतीशिवाय राजकीय भाष्य करू नये, अशा सक्त सूचना केल्या असल्याचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सांगितले.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीची कामगिरी खालावल्यानंतर निकालाचे विश्लेषण करताना संघाचे मुखपत्र असलेल्या ऑर्गनायझर मध्ये अजित पवार यांना सोबत घेण्याबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली. त्यानंतर भाजपच्या काही आमदारांनी देखील त्याचच री ओढत पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमुळे भाजपला कोणताही फायदा झाला नसल्याचे मत व्यक्त केले.

अर्थातच, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून याबाबत तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. अजित पवार यांच्यामुळे भाजपचे नुकसान झाले नाही. उलट मतदारांमध्ये भाजप बद्दल असलेल्या नाराजीचा फटका अजित पवार यांना सोसावा लागला, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या आक्रमक नेत्या रूपाली पाटील यांनी व्यक्त केले. अमोल मिटकरी यांनी त्याच्याही पुढे जाऊन, वेगळा विचार करावा लागेल असा इशारा दिला. मात्र, राज्यातील विधानसभा निवडणुका तोंडावर आल्या असताना मतदारांसमोर युतीमध्ये बेपनाह असल्याचे चित्र उभे राहू नये यासाठी महायुतीतील तिन्ही घटक पक्षांचे नेते आटोकाट

# शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात विरोधक आक्रमक

## महायुतीच्या स्थानिक नेत्यांचाही विरोध



**मुंबई :** सरकारचा महत्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात शेतकरी रस्त्यावर उतरले असतानाच विधानसभा निवडणूक तोंडावर असताना महाविकास आघाडीनेही या प्रकल्पच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. स्थानिक समीकरण लक्षात घेऊन महायुतीचे नेतेही या प्रकल्पाच्या विरोधात आहेत.

नागपूर गोवा शक्तिपीठ महामार्ग हा सरकारचा महत्वाचा प्रकल्प आहे. या महामार्गाने महाराष्ट्र आणि गोव्यातील सर्व शक्तिपीठे जोडली जाणार आहेत. मात्र, हा महामार्ग जात असलेल्या केवळ पश्चिम महाराष्ट्रातीलच नव्हे तर मराठवाड्यातील बहुतांश क्षेत्र बागायती शेतीचे आहे. त्यामुळे शेतकरी या महामार्गाच्या विरोधात रस्त्यावर उतरले आहेत. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात अनेक ठिकाणी त्यासाठी आंदोलने होत आहेत. त्यातच सरकारला घेरण्यासाठी विरोधकांनी हा मुद्दा उचलून धरला आहे.

नुकतेच काँग्रेसमधून भारतीय जनता पक्षात डेरेदाखल झालेले मराठवाड्यातीलच नव्हे तर राज्यातील वजनदार नेते माजी मुख्यमंत्री व विद्यमान खासदार अशोक चव्हाण, कोल्हापूरचे नवनिर्वाचित खासदार शाहू महाराज छत्रपती यांच्यासह त्या त्या भागातील प्रभावशाली नेते शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात आहेत. ज्येष्ठ मंत्री हसन मुश्रीफ यांनी देखील या प्रकरणी जनतेच्या, शेतकऱ्यांच्या भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यापर्यंत पोहोचविण्याची ग्वाही देत आपण शेतकऱ्यांच्या बाजूचे असल्याचे सूचित केले आहे.

याशिवाय दरवर्षी पर्जन्यमानाचा बेभरवशीपणा वाढत चालल्यामुळे सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात पावसाळ्यामध्ये पूर परिस्थितीची व्याप्ती वाढत चालली आहे. नियोजित शक्तीपीठ महामार्गावर अनेक पूल बांधले जाणार असून त्यांच्या भिंतींमुळे पूरस्थितीचे गांभीर्य आणखी वाढणार असल्याची शक्यता या प्रकल्पाच्या विरोधाला आणखी धार देत आहे.

या लोकसभा निवडणुकीत महायुतीला अपेक्षित कामगिरी पार पाडता आलेली नाही. आरक्षणाच्या प्रश्नावरून मराठा समाजात सरकार बद्दल नाराजी आहे तर आरक्षणाच्या बचावासाठी सुरू केलेल्या आंदोलनाकडे सरकार लक्ष देत नाही, असा इतर मागासवर्गीय समाजाचा आक्षेप आहे. याशिवाय विविध विभागातील स्थानिक समस्यांसह राज्याच्या पातळीवरील अनेक समस्यांनी सत्ताधाऱ्यांसमोर आव्हान उभे केले आहे. अशावेळी विधानसभा निवडणुका तोंडावर आल्या असताना सरकार शक्तिपीठ महामार्गाबाबत काय भूमिका घेणार, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# भाजपकडून महाराष्ट्राला द्वेषपूर्ण वागणूक

## आदित्य ठाकरेंचे नागरी उड्डाण मंत्र्यांना पत्र

**मुंबई :** पालघरमधील प्रस्तावित विमानतळ, छत्रपती संभाजीनगर विमानतळ, आणि नवी मुंबई विमानतळ नामांतरणांच्या रखडलेल्या मुद्द्यांकडे शिवसेना (ठाकरे) नेते, युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू किंजरापू यांना पत्र लिहून लक्ष्य वेधले. यावेळी भाजपने महाराष्ट्राला दिलेल्या द्वेषपूर्ण वागणुकीचा ठाकरेंनी चांगलाच समाचार घेतला. प्रादेशिक पक्षाचे नेतृत्व केल्याने राज्याच्या भावनांची जाण आहे. त्यामुळे महाराष्ट्राला योग्य सन्मान मिळवून द्यावा, अशी मागणी उड्डाण मंत्र्यांकडे पत्राद्वारे केली आहे.

केंद्रात एनडीएचे सरकार सत्तेत आहे. टीडीपी या एका मजबूत प्रादेशिक पक्षाचे नेतृत्व करणाऱ्या राम मोहन नायडू किंजरापू यांच्याकडे उड्डाण मंत्री पदाची जबाबदारी आहे. एका राज्याच्या भावनांची आपल्याला जाण आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या भावनांचा विचार करून प्रलंबित मागण्यांवर योग्य निर्णय घेऊन राज्याचा सन्मान करावा, अशी विनंती ठाकरेंनी पत्रातून केली आहे. टीडीपी पक्षाच्या एनडीएतील समावेशाबाबत आदित्य यांनी उड्डाण मंत्र्याचे अभिनंदन करत राज्यातील विविध मुद्दे निदर्शनास आणून दिले. महाविकास आघाडीने केंद्राकडे छ. संभाजीनगर येथील छ. संभाजी महाराज विमानतळ आणि नवी मुंबईतील दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नाव देण्याचा प्रस्ताव महाविकास आघाडी सरकारच्या काळात मंजूर केले. केंद्राच्या मंजुरीसाठी हे प्रस्ताव पाठवून दिले. या प्रस्तावाच्या अंमलबजावणीसाठी वारंवार मागणी केली. परंतु, भाजपने मागील चार वर्षात महाराष्ट्रात द्वेषपूर्ण राजकारण केल्याने हे प्रस्ताव प्रलंबित आहेत. पालघर जिल्ह्यातील प्रस्तावित विमानतळाचा प्रस्ताव देखील लालफितीत अडकला आहे. प्रवासी आणि मालवाहतुकीमुळे भारताच्या पश्चिम किनारपट्टीला या विमानतळांमुळे आधार मिळेल. वारंवार या संदर्भात पत्रव्यवहार केला.



# देशात आणखी दोन वंदे भारत एक्सप्रेस धावणार

**दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवार २० जून रोजी चैन्नई दौऱ्यावर जाणार असल्याचे सांगितले जात आहे. या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान मोदी २ वंदे भारत एक्सप्रेसना हिरवा झेंडा दाखविणार आहेत. यामध्ये चेन्नई ते नगरकोइल आणि मदुराई ते बंगळुरू या वंदे भारत एक्सप्रेसचा समावेश आहे. तसेच या दौऱ्यावेळी मोदी तामिळनाडूमधील अनेक प्रकल्पांचे देखील उद्घाटन करणार आहेत. तमिळनाडू दौऱ्यादरम्यान पंतप्रधान मोदी चेन्नई ते नगरकोइल या वंदे भारत एक्सरप्रेसरला हिरवा झेंडा दाखविणार आहेत. तर पंतप्रधान मोदी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे मदुराई ते बंगळुरू या वंदे भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखविणार आहेत.

पंतप्रधान मोदी २० जूनच्या तमिळनाडू दौऱ्यादरम्यान अनेक प्रकल्पांचे उद्घाटन करणार आहेत. पंतप्रधान मोदी २० जून रोजी दुपारी चेन्नईला पोहोचण्याची शक्यता आहे. २० जून रोजी पुराची थलाइवर डॉ. एमजी रामचंद्रन चेन्नई सेंट्रल रेल्वे स्थानकावर कार्यक्रमाचे आयोज करण्यात आले आहे. या कार्यक्रमात पंतप्रधान मोदी सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान मोदी चेन्नई ते नगरकोइल या वंदे भारत एक्सप्रेसचे उद्घाटन करणार आहेत. चेन्नईतील बेसिन ब्रिज रेल्वे जंक्शनजवळ वंदे भारत मेंटेनन्स डेपो प्रकल्प उभारला जाणार आहे. २० जून रोजी पंतप्रधान मोदी या प्रकल्पाची पायाभरणी करणार आहेत. अरल्वनोझी - नागरकोइल आणि मेलाप्पलयम - तिरुनेलनवेली या दुहेरी मार्गाचे देखील पंतप्रधान मोदी उद्घाटन करणार आहेत. या मार्गामुळे नागरिकांचा प्रवास अधिक सुलभ होणार आहे. तमिळनाडू दौऱ्यादरम्यान रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव देखील पंतप्रधान मोदींसोबत उपस्थित राहणार असल्याचे सांगितले जात आहे.

# वसई हत्याकांडाबाबत चित्रा वाघ यांनी नवा अँगल समोर आणला!

## दोघे लग्न करणार होते, पण मुलीच्या संपर्कात दुसरा मुलगा आला

**मुंबई :** वसईच्या गौराईपाडा परिसरात मंगळवारी एका तरुणीची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. आरती यादव असे या मृत तरुणीचे नाव असून रोहित यादव (ठेहळीं धरवर्रीं) या तरुणाने लोखंडी पान्याने १५ घाव घालत तिची हत्या केली होती. या प्रकरणी बुधवारी भाजपाच्या महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ (उहळीर थरसह) यांनी पोलीस उपायुक्त पौर्णिमा श्रींगी-चौगुले आणि आचोळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांची भेट घेतली. गुन्ह्याच्या तपासाबाबत माहिती घेतली. त्याचबरोबर आचोळे पोलीस ठाण्यात मृत तरुणी आरती यादव हिच्या आईची ही भेट घेतली. तरुणीच्या हत्याकांडप्रकरणी (तरीरळ चींवशी उरीश) पोलीसांचा तपास योग्य रितीने सुरु असल्याचे चित्रा वाघ यांनी सांगितले. पोलिसांनी आरोपी रोहित विरोधात शनिवारी एन.सी.दाखल केल्याचं सांगितलं आहे. तरुणीला न्याय मिळवून देण्यासाठी चांगलात चांगला वकील आम्ही देऊ. तसेच समाजाने अशा घटनेच्या वेळी बघ्याची भूमिका न घेता पुढे यायला पाहिजे, असे आवाहनही चित्रा वाघ यांनी केले.

**नेमकं काय घडलं?**

झालेली घटना दुर्दैवी आहे, पाहिल्यावर काळजाचा थरकाप उडवणारी आहे, मी आता सीसीटीव्ही फुटेज बघितलं. त्यामध्ये मी मुलीची पार्श्वभूमी जाणून घेतली, तिच्या



पालकांशी बोलले. त्यावेळी हे लक्षात आलं की, मुलगा-मुलगी आधीपासून एकमेकांना ओळखत होते. ८ तारखेला मोबाईल फोडला म्हणून तो भरुन पाहिजे, ही तक्रार करण्यासाठी पोलीस स्टेशनला गेले होते. पोलिसांनी त्यांना बोलावून घेतलं, जरा दम दिला. दम दिल्यानंतर मुलीने सांगितले की, तुम्ही काही बोलू नका, आम्ही समजून घेतो. मग ते बाहेर पडले तरी पण पोलिसांनी वन फोर्टी नाईन ची नोटीस बजावली त्या मुलाला दम दिला की पुन्हा या मुलीला त्रास होता कामा नये आणि त्यानंतर ते घरी गेले नऊ तारखेनंतर १७ तारखेपर्यंत कुठल्याही पद्धतीचं कम्युनिकेशन त्या मुलीशी किंवा तिच्या तिला त्रास देणे अशा पद्धतीची कुठली तक्रार आली नाही १७ तारखेला त्या मुलीच्या फोनवर फोन आला त्याच मुलाचा आणि त्याने सांगितलं की माझा चुकून नंबर लागला, तू परत तक्रार करू नको पोलीस स्टेशनला. कारण पोलिसांनी सांगितलं होतं की, जर ही पोलीस स्टेशनला आली तुझ्यावर आम्ही गुन्हा दाखल करू आणि मग तुला सोडणार नाही, असं दम देऊन पाठवलं आणि तो फोन कट झाला आणि १८ तारखेला मात्र त्याने तरुणीची हत्या केली. मला इथे एवढंच सांगायचं आहे की, याच्यामध्ये दहा दिवसांमध्ये काही तक्रार नव्हती, असे चित्रा वाघ यांनी सांगितले.

**मुलगी दुसऱ्या मुलाच्या संपर्कात, मुलाचा आत्महत्येचा प्रयत्न**

जी माहिती समोर आली आहे त्याच्यामध्ये मुलगा आणि मुलगी लग्न करणार होते पण नंतर तिच्या संपर्कात दुसरा कोणीतरी मुलगा आला. त्याच्याबद्दल मुलाने त्याच्या आईवडिलांना, तिच्या सांगितलं, त्या संबंधित मुलालाही सांगितलं, कुठून काही रिस्पॉन्स आला नाही. या दहा दिवसांमध्ये त्याने दोनदा आत्महत्येचा पण प्रयत्न केला त्या मुलाने, अशी पण माहिती समोर येते. त्याच्यानंतर कुठलाच काही रिस्पॉन्स आला नाही आणि नंतर त्याने हे जे टोकाचे पाऊल उचलले. समर्थन कुठल्याच गोष्टीला नाही, शिक्षा तर शंभर टक्के होणार, असे चित्रा वाघ यांनी म्हटले.

या घटनेमध्ये स्वतः राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी गृहमंत्री राज्याचे गृहमंत्री देवेंद्रजी यांनी या प्रकरणांमध्ये लक्ष घातले आहे. कमिशनर साहेबांशी ते बोलले आहेत, संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत. सकाळी मी डीसीपी मॅडमना भेटले. त्याच्यामुळे आरोपी सुटणार नाही, चांगल्या चांगल्या वकील देव फाशीची शिक्षाही होईल ही घटना होत असतानाही दिवसा झालेली घटना आहे आणि त्यावेळेला लोकांनी बघायची भूमिका घेतली हे मात्र फारच दुर्दैवी आहे. मला हे सांगायचे तुमच्या माध्यमातून ही काही पहिली घटना नाही, यापूर्वीही अशा घटना घडल्या आहेत. त्यामुळे लोकांनी फक्त बघ्याची भूमिका न घेता या घटनेत सुद्धा एक मुलगा आला होता वाचवायला बाजूचे दोघेजण उभे होते त्यात तिघांनी मिळून त्या मुलाला जरी मदत मिळाली असती तर आज मुलगी वाचली असती. म्हणजे समाजाने सुद्धा फक्त बघायची भूमिका न घेता अशा जर काही घटना घडल्या तर पुढाकार घेतला पाहिजे. कारण ही विकृती आहे, हा विकृतपणा आहे आणि या विकृतपणाला रोखले पाहिजे, असे चित्रा वाघ यांनी सांगितले.

**पोलिसांनी कारवाई केली होती पण...**

ज्या वेळेला अशा घटना घडतात त्यावेळेला फक्त बघायची भूमिका न घेता समाजाने सुद्धा पुढे येणं गरजेचे आहे आणि जर आले असते तर ती मुलगी नक्की वाचली असती. मी मुलीच्या आईशी पण बोलले, बिहारचे आहेत ती लोकं इथं पोटापाण्यासाठी आले. मुलगी सुद्धा त्या ठिकाणी काम करून घराचा उदरनिर्वाह करायची आणि त्यामुळे ही घटना घडली ही अतिशय वाईट आहे. अशा घटना होऊ नये म्हणून मी आता पोलिसांशी बोलले. बाळासाहेब पवार इथले पोलीस निरीक्षक आहेत त्यांनी मला काही पत्रकं दाखवली बऱ्यापैकी तो जो एरिया आहे त्याच्यामध्ये उत्तर भारतीय लोक जास्त राहतात. कष्टकरी वर्ग त्या ठिकाणी आहे वेळोवेळी त्या ठिकाणी जाऊन वेगळी वेगळी पत्रक वाटणे कुठल्या अडचणीमध्ये येऊ नका कोणी फसवताय तुमच्या मुलांची काळजी घ्या काही असेल तर पोलिसांना त्या ठिकाणी संपर्क करा अशा बाबतच्या सूचना या सततच्या त्या ठिकाणी दिल्या जातात. या प्रकरणात पोलिसांनी प्रिव्हेंटिव्ह क्शन जी घेतलेली आहे १४९ ची जी नोटीस त्या ठिकाणी दिलेली आहे हे पोलिसांनी त्यांचे काम त्या ठिकाणी केलंय. झालेली घटना ही दुर्दैवी आहे या घटना होऊ नये भविष्यामध्ये यासाठी तुम्हाला मला आणि आपल्याला सगळ्यांना सज्ज होणे गरजेचे आहे.

# आषाढी वारीनिमित्त 'आपला दवाखाना' वारकऱ्यांच्या सेवेत

**मुंबई :** आषाढी एकादशीनिमित्त राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो पालख्या पंढरपूरच्या दिशेने रवाना होतात. यामध्ये साधारणपणे १२ लाखांपेक्षा अधिक वारकरी दरवर्षी सहभागी होत असतात. या वारकऱ्यांची वारी सुखरूप व आरोग्यपूर्ण व्हावी यासाठी राज्य सरकारने 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत यंदाही 'आपला दवाखाना' (क्शरश्रींह ऊशरिींशपीं) वारकऱ्यांच्या सेवेसाठी सज्ज झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आषाढी एकादशी वारीनिमित्त वारकऱ्यांना आरोग्य सेवा उपलब्ध करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये पालखी मार्गावर आरोग्य विभागाने पाच किमी अंतरावर आरोग्य सेवा उपलब्ध केली आहे. आरोग्य विभागाने पालखी मार्गावर सहा हजारांपेक्षा अधिक आरोग्य कर्मचारी, आपला दवाखाना, फिरती रुग्णवाहिका पथके, आरोग्यदूत सज्ज ठेवले आहेत. मुक्कामाच्या ठिकाणीही अतिदक्षता कक्ष, हिरकणी कक्ष उपलब्ध केले आहेत.

वारकऱ्यांच्या आरोग्याची पुरेपूर दक्षता पालखी मार्गातील खासगी वैद्यकीय दवाखान्यात वारीतील रुग्णांसाठी १० टक्के खाटा आरक्षित ठेवल्या आहेत. वारकऱ्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी व पालखी मार्गावर अत्यवस्थ रुग्णांसाठी पाच खाटांचे ८७ अतिदक्षता कक्ष सुरू करण्यात आले आहेत. महिला वारकऱ्यांसाठी १५८ स्त्री रोग तज्ज्ञ विविध ठिकाणी सज्ज ठेवण्यात आले आहेत. तसेच, १३६ हिरकणी कक्ष उभारण्यात आले आहेत. याशिवाय, १०२ आणि १०८ क्रमांकाच्या ७०७ रुग्णवाहिका २४ तास सज्ज असणार आहेत. दिंडी प्रमुखांसाठी ५ हजार ८८५ औषधांचे कीट उपलब्ध केले आहेत.

त्याचबरोबर पालखी मार्गावरील दोन हजार ७५२ पाणी स्रोतांचे सर्वेक्षण व निर्जंतुकीकरण करण्यात आले आहे. त्यासोबत सात हजार ९९१ हॉटेल, उपहारगृहे, ढाबा येथील १९ हजार ५०२ कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे.

वारी मार्गावर ठिकठिकाणी कीटकजन्य आजार सर्वेक्षण व प्रतिबंधात्मक उपाययोजना करून, नागरिकांची असंसर्गजन्य आजारांची तपासणी, समुपदेशन व उपचार करण्यात आले आहेत.

आपला दवाखाना वारकऱ्यांच्या सेवेत

वारकऱ्यांना चांगली आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी यासाठी वारी मार्गामध्ये आरोग्य विभागाच्या वतीने मुक्कामाच्या ठिकाणी तसेच प्रत्येक पाच किलोमीटर अंतरावर एक आपला दवाखान्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. पालखी मार्गावर २५८ आपला दवाखाना उभारले आहेत. दिवेघाटामध्ये पायथ्याशी, मस्तानी तलाव आणि डोंगरमाथा अशा तीन ठिकाणी आपला दवाखाना उभारण्यात येणार आहे.

**महाआरोग्य शिबिरासाठी तीन हजार कर्मचारी नियुक्त**

वारी मार्गादरम्यान वारकऱ्यांसाठी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येते. ही महाआरोग्य शिबिरे वाखरी, तीन रस्ता, गोपाळपूर या ठिकाणी भरवली जातात. वारकऱ्यांची संख्या लक्षात घेता या महाआरोग्य शिबिरासाठी आरोग्य विभागाने तीन हजार ३६२ आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

# अजित पवार गटात अस्वस्थता?

## नरहरी झिरवळांनी केले शरद पवारांचे कौतुक

**नाशिक :** अजित पवार गटामध्ये अस्वस्थता असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळामध्ये रंगल्या आहेत. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर अजित पवार गटामध्ये अनेकजण नाराज असल्याचे बोलले जात आहे. निवडणुकीमध्ये ४ जागांवर केवळ १ जागेवर अजित पवार गटाला यश आले. त्यामुळे भाजपचे काही कार्यकर्ते अजित पवार गटावर नाराज असून महायुतीला पुनर्विचार करण्याची मागणी करत आहे. दरम्यान, अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवळ यांनी देखील शरद पवार यांचे कौतुक केले आहे. त्यामुळे झिरवळ देखील परतीच्या मार्गावर असल्याचे बोलले जात आहे.

अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवळ यांनी शरद पवार यांचे कौतुक केले आहे. झिरवळ म्हणाले, कोण कोणत्या वाटेवर आहे हे माहिती नाही पण असं होणार नाही. दादांची कामकाजाची पद्धत वेगळी आहे. साहेबांचं (शरद पवार) काम मोठं आहे. साहेबांनी आत्तापर्यंत केलं ते दुसरं कोणी करणारही नाही. साहेबांसारखं काम भविष्यातही कोणी करणार नाही, अस मत नरहरी झिरवळ यांनी मांडलं. त्यांनी शरद पवार यांच्या कामाचं कौतुक केल्याने चर्चांना उधाण आहे. मात्र सोबतच, असं असलं तरी युवा नेतृत्व म्हणून अजित दादांकडे पाहिलं जातं त्यामुळे आमदार जाणार नाहीत, असे देखील झिरवळ यांनी ठामपणे सांगितलं आहे.

तसेच आज नरहरी झिरवळ यांचा वाढदिवस आहे. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी लावण्यात आलेल्या फ्लॅक्सवरुन चर्चांना आणखी उधान आले. त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा जाहिरातीवर शरद पवार आणि श्रीराम शेटे यांचा फोटो लावण्यात आला आहे. त्यामुळे अजित पवार गटाचे आमदार परतीच्या वाटेवर असल्याच्या चर्चेला आणखी उधाण आलं आहे. मात्र हे पोस्टर कार्यकर्त्यांनी लावले असल्याचे बोलत झिरवळ यांनी स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला.

# भाजप हा मुघलांनंतरचा सर्वात मोठा आक्रमक : संजय राऊत

मुंबई : मुघल आक्रमकांच्या नंतर भारतीय जनता पक्ष हा दुसऱ्या क्रमांकाचा मोठा आक्रमक आहे. मुघलांनी महाराष्ट्रावर आक्रमण केल्यानंतर शिवसेना फोडून भाजपने दुसरे मोठे आक्रमण केले आहे, अशी टीका शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे.

शिवसेना शिंदे गटाचे नवनिर्वाचित खासदार रवींद्र वायकर यांच्यावरही राऊत यांनी टीकास्त्र सोडले. वायकर हे पूर्वी शिवसेनेत होते. मुंबई महापालिकेचे स्थायी समिती अध्यक्ष होते. त्यांनी सक्तवसुली संचालनालयाच्या भीतीने पक्ष सोडून शिंदे गटाची वाट धरली. आम्ही मात्र चौकशा, तुरुंगवास याला न घाबरता पक्षाशी एकनिष्ठ राहिलो.

# ट्रकच्या धडकेत ५ महिलांचा जागीच मृत्यू

**पंढरपूर :** सांगोला तालुक्यातील पंढरपूर-कराड मार्गावर भीषण अपघात झाला. यामध्ये भरधाव ट्रकने पाच महिलांना चिरडले. तर दोन महिला गंभीररित्या जखमी झाल्या आहेत. शेतातील कामे आटोपून या महिला घरी माघारी जात होत्या. त्यादरम्यान हा अपघात झाला.

पंढरपूर-कराड मार्गावर झालेल्या भीषण अपघातात मृत्युमुखी पडलेल्या सर्व पाच महिला सांगोला तालुक्यातील कटफळ गावच्या होत्या. मंगळवारी दुपारी चारच्या दरम्यान शेतातील काम करून घरी परतणाऱ्या ७ महिलांना एका ट्रकने चिरडले. यापैकी पाच महिलांचा मृत्यू जागीच झाला तर यामधील दोन महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. सांगोला तालुक्यातील चिकमहुद गावातील बंडगरवाडी येथे हा अपघात झाला. दरम्यान, या सर्व महिला कटफळ गावच्या असून, बंडगरवाडीतून कामावरून सुटल्यानंतर घरी जाण्यासाठी गाडीची वाट बघत उभ्या होत्या. या दरम्यान कोळसा घेऊन जाणारा एक ट्रक समोरून आला आणि थेट महिलांच्या अंगावर गेला.

# पावसाळा कालावधीत मदतकार्यासाठी सुसज्ज राहा

## मपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देश

**नवी मुंबई :** यावर्षी अद्याप पुरेशा प्रमाणात पावसाला सुरुवात झालेली नसून, येत्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणावर पावसाला सुरुवात होईल, हे लक्षात घेऊन सतर्कता राखावी, असे निर्देशित करीत, नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दरडप्रवण क्षेत्राकडे विशेष लक्ष द्यावे असे निर्देश दिले. विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत आयुक्तांनी नाले व गटारे सफाईच्या कामांचा आढावा घेत नाल्यांच्या प्रवाह क्षेत्रात अजूनही काही झोपड्या शिल्लक असतील, तर संबधित विभाग अधिकारी यांनी पुन्हा बारकाईने प्रत्यक्ष पाहणी करावी व अशा झोपड्या आढळल्यास संभाव्य हानी टाळण्यासाठी, त्या त्वरित हटवाव्यात, असे स्पष्ट निर्देश दिले.



पाऊस लांबल्यामुळे सद्यस्थितीत नमुंमपा क्षेत्रात आठवड्यातील तीन दिवस संध्याकाळच्या वेळेत पाणी पुरवठा देता येत नाही, यामागील भूमिका नागरिकांनी समजून घेतली आहे. महानगरपालिकेच्या मोरबे धरणात आणखी ३९ दिवस पुरेल इतका पाणीसाठा शिल्लक असून, पुरेशा प्रमाणात पाऊस पडावा, याच्या आपण प्रतीक्षेत आहोत. त्यानुसार पाणीपुरवठ्याचे नियोजन केले जात आहे. त्याची माहिती वेळोवेळी नागरिकांना देण्याच्या सूचना आयुक्तांनी यावेळी केल्या.

यावर्षी पूर्वापार पद्धतीने नाल्यांमधील प्रवाहात येणारे अडथळे दूर करून, नालेसफाई करण्यात आली असून, आगामी काळात नाल्यांची गाळ काढून सखोल सफाई करणेबाबत नियोजन करावे, असे आयुक्तांनी सूचित केले. तसेच धारण तलावांच्या सफाईबाबतही आवश्यक परवानग्या मिळवण्यासाठी पाठपुरावा करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

पावसाळी कालावधीत उद्भवणारे आजार लक्षात घेऊन, आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, तसेच साथरोगांवरील आवश्यक औषधांची उपलब्धता करून ठेवणेबाबत आरोग्य विभागास निर्देशित करण्यात आले. पावसाळा लांबल्यामुळे डासांच्या प्रमाणात वाढ होईल, अशी नैसर्गिक परिस्थिती लक्षात घेऊन, प्रभावीपणे प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचेही आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले.

पावसाळी कालावधीत संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी, जाहीर केलेल्या अतिधोकादायक इमारतींमधील रहिवास वापर पूर्णपणे थांबविण्याची कार्यवाही करण्याचे निर्देशित करतानाच, आपत्कालीन निवाऱ्याच्या दृष्टीने समाजमंदिरे, विविध भवने व इतर आनुषांगिक जागांची उपलब्धता करणेबाबत तसेच सिडकोकडे यासाठी जागा उपलब्धतेबाबत पाठपुरावा करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले.

घाटकोपर येथील दुर्घटनेनंतर नवी मुंबई महानगरपालिकेने अत्यंत तत्परतेने अनधिकृत होर्डिंग निष्कासित करण्याची कार्यवाही केली असून नोंदीत ५३ पैकी ४७ अनधिकृत होर्डिंग हटविलेले आहेत. उर्वरित ४ एमआयडीसी अखत्यारितील होर्डिंगही त्यांचेमार्फत त्वरित हटविण्यासाठी अधिक पाठपुरावा करण्यात यावा, असे आयुक्तांनी निर्देशित केले.

परवाना विभाग तसेच नगररचना विभाग यांच्यामार्फत दिल्या जाणाऱ्या परवानग्या, परवाने, प्रमाणपत्रे याची माहिती नवी मुंबई महानगरपालिकेच्या वेबसाईटवर अपलोड करण्याचे निर्देश आयुक्तांमार्फत देण्यात आले. त्याचप्रमाणे जन्मदाखले संबधितांपर्यंत पोहचविण्यासाठी ऑनलाईन प्रणाली सक्षम करावी असेही निर्देश आयुक्तांनी दिले. या सर्व बाबींवर तत्परतेने कार्यवाही करण्याचे निर्देशित करण्यात आले.

१५ जूनपासून यंदाच्या शैक्षणिक वर्षास सुरुवात झाली असून साधारणत: ६ हजार नवीन विद्यार्थी नमुंमपा शाळांमध्ये प्रविष्ट झाले आहेत. त्यांच्यासाठी पुरेशी बैठक व्यवस्था असल्याबाबतचा आढावा आयुक्तांनी घेतला. त्याचप्रमाणे शाळांमधील डिजीटल बोर्ड सुविधा, प्रयोगशाळा, ग्रंथालय, मैदाने अशा सेवांचाही आढावा घेण्यात आला.

या प्रसंगी उपस्थित अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व शिरीष आरदवाड तसेच इतर विभागप्रमुख यांच्याकडून शासन, लोकन्यायालय आदी स्तरावरील पत्रव्यवहाराचा आढावा घेण्यात आला. पावसाळी कालावधीत सर्व घटकांनी क्षेत्रीय स्तरावर सतर्क रहावे व मदतकार्यासाठी सुसज्ज असावे असे निर्देश आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी यावेळी दिले.

# शरद पवार पायी वारीत सहभागी होणार

## 'आषाढी'ला वारकऱ्यांसोबत चालणार!



**पुणे :** राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यंदाच्या आषाढी वारीत सहभागी होणार आहेत. पंढरपूरला जाणाऱ्या आषाढी पालखी सोहळ्यात 'एक दिवस तरी वारी अनुभवावी' हा उपक्रम राबविला जातो. साहित्यिक, विचारवंत, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, कलावंत यांचा या वारीत सहभाग असतो. यंदा शरद पवार या वारीत सहभागी होणार आहेत. त्यांच्या सोबत कॉंग्रसचे ज्येष्ठ नेते माजी आमदार उल्हासदादा पवार , जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे वंशज ह.भ.प. बापूसाहेब महाराज देहूकर, महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी, पंढरपूर येथील कैकाडी महाराज मठाचे ह.भ.प. भारत महाराज जाधव, मुकेश माचकर, कवी अरुण म्हात्रे, अभिव्यक्ती चॅनलचे रविंद्र पोखरकर आदी मान्यवर सहभागी होणार आहेत, अशी माहिती शामसुंदर महाराज सोन्नर यांनी दिली.

'एक दिवस तरी वारी अनुभवावी' उपक्रम ७ जुलै रोजी

'एक दिवस तरी वारी अनुभवावी' हा उपक्रम गेली दहा वर्षे राबविला जात आहे. यंदाचे अकरावे वर्ष असून शामसुंदर महाराज सोन्नर यांच्या नेतृत्वाखाली आणि शरद कदम, अविनाश पाटील, वर्षा देशपांडे, सुभाष वारे, राजाभाऊ अवसक, विशाल विमल, दत्ता पाकिरे यांच्या पुढाकाराने याचे आयोजन केले जाते. यंदा संत तुकोबारायांच्या पालखी सोहळ्यात ७ जुलै रोजी ही मंडळी बारामती ते सणसर हे अंतर चालणार आहेत. या उपक्रमाची माहिती देण्यासाठी शामसुंदर महाराज सोन्नर, सामाजिक कार्यकर्ते शरद कदम यांनी सोमवारी (दि. १७ जून) मुंबईतील 'सिल्व्हर ओक' या शरद पवार यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेतली.

वारीतील विचार, शिस्त, बंधूभाव, समता हा विचार ही मंडळी 'एक दिवस तरी वारी अनुभवावी' यात सहभागी होऊन दिवसभर चालून समजून घेतात. या दरम्यान दुपारच्या विसाव्यापर्यंत काही निवडक लोक आपले अनुभव कथन करतात. याची माहिती शरद कदम यांनी शरद पवार यांना दिली. उपक्रम अत्यंत स्तूत्य असून सामाजिक एकोपा निर्माण होण्यासाठी फार महत्वाचा आहे, असे शरद पवार म्हणाले. या उपक्रमात या वर्षी मी सहभागी होईल, असेही ते म्हणाले. या उपक्रमात महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कबड्डीला प्रोत्साहन देण्यासाठी निधी उपलब्ध करणार

## उपमुख्यमंत्री अजित पवारांची ग्वाही

**मुंबई :** राष्ट्रीय क्रीडा संहितेचे राज्य कबड्डी असोसिएशन कार्यकारिणीने काटेकोरपणे पालन करावे व त्यानुसार राज्यस्तरीय निवडणूक पार पाडावी. तसेच कोणत्याही खेळाडूवर अन्याय होणार नाही याची काळजी घ्या, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार यांनी दिल्या. कबड्डी खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.




महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन सल्लागार समिती व कार्यकारिणीच्या बैठकीचे आज दादर शिवाजी पार्क येथील कबड्डीमहर्षी स्व. शंकरराव साळवी सभागृहात महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले होते. यावेळी असोसिएशनचे सर्वश्री उपाध्यक्ष, आमदार भाई जगताप, माजी आमदार अमरसिंह पंडित, दिनकर पाटील, रा. उपाध्यक्षा शकुंतला खटावकर, सरकार्यवाह बाबुराव चांदेरे, खजिनदार मंगल पांडे, सहकार्यवाह रविंद्र देसाई, असोसिएशनचे आजीव सदस्य तथा उपमुख्यमंत्र्यांचे खासगी सचिव अविनाश सोलवट यांच्यासह कार्यकारिणी सदस्य आणि असोसिएशनचे सदस्य उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, कबड्डी खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी बक्षिसांच्या रकमा वाढविण्यात आल्या आहेत. खेळांना महत्व प्राप्त व्हावे यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही. ग्रामीण भागात कबड्डी जास्त रूजली आणि वाढली असल्याने आमदार निधी, जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध करून दिला जातो. कबड्डी खेळाला सुवर्ण दिवस आणण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. राष्ट्रीय संहितेनुसार कार्यकारिणी निवडणूक घेण्यात यावी.

स्पोर्ट्स कोडचे पालन करण्यात यावे. २१ जून रोजी नव्याने होणाऱ्या कार्यकारिणीसाठी निवडणूक होणार असून, १९ जून ही जिल्हानिहाय मतदारांची नावे स्वीकारण्याची अंतिम तारीख असल्याचेही त्यांनी सांगितले.

# उजनी पर्यटन विकास आराखड्यासाठी सुमारे २०० कोटीचा निधी मंजूर



**सोलापूर :** सोलापूर जिल्हा हा पर्यटनासाठी खूप महत्त्वाचा जिल्हा असून येथे उजनी धरणात जल पर्यटन, ९१ धार्मिक स्थळे असल्याने धार्मिक पर्यटन, कृषी क्षेत्रात अग्रेसर असल्याने कृषी पर्यटन तसेच विनयार्ड पर्यटन विकसित होण्यासाठी पायाभूत सोयी सुविधा निर्माण केल्यास जिल्ह्याचा पर्यटनाच्या दृष्टीने सर्वांगिण विकास होऊन येथे देश विदेशातील पर्यटकांची संख्या वाढून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांच्याकडे जिल्ह्याचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा सादर केला.

आराखड्यास तात्काळ उपमुख्यमंत्री यांनी तत्वत: मान्यता देऊन यासाठी सुमारे १५० ते २०० कोटीच्या निधीची तरतूद करण्यात येईल, असे सांगितले.

# 'आरटीई' प्रवेशाची सुनावणी लांबणीवर

## हस्तक्षेप याचिका दाखल करून घेत



**मुंबई :** गेल्या अनेक दिवसांपासून आरटीई प्रवेश प्रक्रिया न्यायालयीन पेचात रखडली आहे. मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत न्यायालयाने ही सुनावणी ११ जुलैपर्यंत पुढे ढकलली आहे. पुण्यातील एक व मुंबईतील २ शिक्षण संस्थांनी न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल केल्याने सुनावणी लांबली. न्यायालयाने या हस्तक्षेप याचिका दाखल करून घेत त्यांना १० दिवसांची मुदत दिली आहे.

आरटीई २५ टक्के आरक्षणाच्या संदर्भात ९ फेब्रुवारी २०२४ रोजी महाराष्ट्र सरकारच्या शालेय शिक्षण विभागाने एक अधिसूचना काढून आरटीई प्रवेश प्रक्रियेत बदल केला होता.

मुंबई उच्च न्यायालयात आरटीईच्या प्रवेश प्रक्रियेवर सुनावणी सुरू असल्याने शालेय शिक्षण विभागानेही ७ जूनला लॉटरी सोडत काढली; परंतु पात्र विद्यार्थ्यांची यादी जाहीर केली नाही. याबाबत १२ जूनला सुनावणी होणार होती; परंतु काही कारणास्तव ही सुनावणी दुसऱ्या दिवशी म्हणजे १३ जूनला ढकलण्यात आली. मात्र १३ जूनलाही सुनावणी झाली नाही.

त्यानंतर आज १८ जूनला या सर्व याचिकांवर एकत्रित सुनावणी घेण्यात आली. यात काही शाळांच्या हस्तक्षेप याचिका न्यायालयाने दाखल करून घेतल्या आहेत व हस्तक्षेप करणाऱ्या तीनही संस्थांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी दहा दिवसांची मुदत न्यायालयाने दिली आहे. या संस्थांच्या प्रतिपादनावर जनहित याचिकाकर्त्यांना व शासनाला त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी नंतरचे दहा दिवस देण्यात आले आहेत व याची अंतिम सुनावणी ११ जुलै २०२४ होणार आहे. मात्र याचा परिणाम म्हणजे आरटीई २५ टक्काचे प्रवेश लांबणीवर पडणार आहेत व पालकांचा तणाव वाढणार आहे, अशी प्रतिक्रिया अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभेचे कार्याध्यक्ष शरद जावडेकर यांनी दिली आहे.

# शिरुर तालुक्यात ढगफुटीसदृश्य पाऊस

## दुष्काळ पडलेले कासारी गाव झाले जलमय

**शिक्रापूर :** कासारी (ता. शिरुर) येथे गेली काही दिवस पाण्याचा दुष्काळ जाणवत होता. मात्र, या परिसरात अचानक ढगफुटीसदृश्य पाऊस झाला. या पावसामुळे संपूर्ण गावच जलमय होऊन ओढ्यांना अचानक पूर आला. त्यामुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले.

कासारी (ता.शिरुर) येथे सायंकाळच्या सुमारास अचानक ढग दाटून आले व विजांच्या कडकडाटासह ढगांच्या गडगडाटामध्ये जोरदार पावसास सुरूवात झाली. तब्बल तासभर जोरदार पाऊस झाल्याने परिसरातील शेताचे बांध फुटून माती वाहून गेली. तर गावातील रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहू लागल्याने रस्त्यांना ओढ्यांचे स्वरूप आले होते. यावेळी अचानक आलेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळित होऊन जोरदार पावसामुळे काही वेळात सर्वत्र पाणीच पाणी झाले.

या पावसामुळे सखल भागात पाणी साचल्याने शेतींनाही तळ्याचे स्वरूप आले होते. तर पावसामुळे वीजपुरवठा पूर्णत: खंडित झाला होता. त्यामुळे ग्रामस्थांचे मोठे हाल झाले असून, गावातील शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र, यावेळी झालेल्या पावसामुळे येथील पाणी पातळी वाढण्यासाठी मदत होणार असल्याने परिसरातील नागरिकांनी व शेतकऱ्यांनी देखील समाधान व्यक्त केले आहे.

**शेतीचे मोठं नुकसान**

**कासारी येथे अचानक मोठ्या प्रमाणात पाउस झाल्याने शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शासनाने येथील शेतींची पाहणी करुन नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी सध्या केली जात आहे.**

# कोअर कमिटीला सोबत घ्या, मोठ्या पराभवानंतर दिल्लीतील नेत्यांच्या सूचना

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीत भाजप महायुतीला मोठा पराभवाचा सामना करावा लागला. देशात अब की बार ४०० पार आणि महाराष्ट्रात ४५ पेक्षा जास्त जागा जिंकण्याचा विश्वास व्यक्त करणाऱ्या भाजपने दोन्ही विजयाचे स्वप्न भंगले. मात्र, एनडीएला स्पष्ट बहुमत मिळाल्यामुळे देशाच्या पंतप्रधानपदी तिसऱ्यांदा नरेंद्र मोदींनी शपथ घेतली. पण, भाजपला अपेक्षित असलेल्या उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातून सर्वात कमी जागा मिळाल्याने दिल्लीकरांनीही या पराभवाची कारणमिमांसा सुरू केली आहे. त्यातच, देवेंद्र फडणवीसांसह राज्यातील भाजप कोअर कमिटीची मंगळवारी दिल्लीत बैठक घेण्यात आली. त्यामध्ये, महाराष्ट्रातील पराभवावर भाष्य करत राज्यातील भाजप नेत्यांची चांगलीच शाळा वरिष्ठांनी घेतली. तसेच, महाराष्ट्रात कोणा एकट्याच्या मर्जीने पक्ष चालणार नाही, कोअर कमिटीला सोबत घ्या, अशा सूचनाच दिल्लीतील नेत्यांनी केल्या आहेत.



लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रीपद सोडण्याची विनंती केली होती. मात्र, भाजपच्या वरिष्ठांनी त्यांना कायम राहण्याच्या सूचना करत, काम सुरुच ठेवा, असे सांगितले होते. त्यानंतर, मंगळवारी दिल्लीत झालेल्या बैठकीतून भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी देवेंद्र फडणवीस आणि कोअर कमिटीला महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. ''कोण्या एका व्यक्तीच्या मर्जीने महाराष्ट्रात पक्ष चालू शकत नाही. कोअर कमिटीला सोबत घेऊनच पक्ष चालवावा लागणार आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडीला थांबवायचं असेल, तर भाजपने एकत्रितपणे काम करायला हवं. महाराष्ट्रातील भाजपच्या सर्वच जुन्या नेत्यांनी सक्रीय करायला हवं,'' अशा शब्दात दिल्लीच्या नेत्यांनी महाराष्ट्रातील कोअर कमिटीच्या बैठकीत राज्यातील भाजप नेतृत्वाची शाळा घेतली. विधानसभा निवडणुकांच्या तयारीला लागा, आत्तापासूनच उमेदवारांना तयारी सुरू ठेवायला सांगा. लोकसभा निवडणुकीत ज्या चुका झाल्या, त्या विधानसभा निवडणुकांमध्ये पुन्हा होऊ देऊ नका, महाराष्ट्रात भाजपची सत्ता आणायची आहे, अशाही सूचना भाजपच्या वरिष्ठांनी कोअर किमिटीला केल्या आहेत.

सोशल मीडिया अधिक वापरा, विरोधकांना प्रत्युत्तर द्या

महाराष्ट्र भाजपच्या सोशल मीडियावर केंद्रीय नेतृत्व नाराज असल्याची माहिती आहे. कालच्या दिल्लीतील बैठकीत राज्यातल्या सोशल मीडियातील प्रचारासंदर्भातही चर्चा झाली. सोशल मीडियात भाजपविरोधात केलेल्या प्रचाराला उत्तर देण्यात राज्यातील नेते कमी पडल्याचे मत भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने व्यक्त केले. तसेच, विरोधकांकडून जे मुद्दे सोशल माध्यमांमध्ये मांडले गेले आहेत, त्याला उत्तर देण्यात भाजपचे राज्यातील नेते कमी का पडले?, अशी विचारणा दिल्लीश्वरांनी भाजपच्या राज्यातील नेत्यांना केली आहे. तसेच, विधानसभा निवडणुकीत तरी विरोधकांना प्रत्युत्तर देण्याच्या दृष्टीनं सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा अधिक वापर करा, अशा सूचनाही राज्यातील नेत्यांना देण्यात आल्या आहेत.

विधानसभेच्या रोडमॅपवर बैठकीत चर्चा

राजधानी दिल्लीत भाजपच्या केंद्रीय नेतृत्वासोबत महाराष्ट्रातील कोअर कमिटीची बैठक पार पडली. त्यामध्ये लोकसभेच्या निवडणुकीत जो काही निकाल आला, त्याच्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. लोकसभा निवडणुकीत कुठे आणि कशी मतं मिळाली, कुठे चांगले यश मिळालं, कुठे कमी मतं मिळाली? त्याची कारण काय काय होती? निवडणुकीत कोण कोणत्या मुद्द्यांचा इम्पॅक्ट होता, अशा सगळ्या गोष्टींची चर्चा या बैठकीत झाली. त्यासोबत येत्या विधानसभेचा रोडमॅपवर देखील एक प्राथमिक चर्चा केल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीनंतर बोलताना सांगितले. तसेच, आगामी लोकसभा निवडणुकांसाठी अत्यंत मजबुतीने आपल्याला निवडणुकीत पुढे कसे जाता येईल? या संदर्भातली सगळी कार्यवाही ही येत्या काळामध्ये आम्ही करणार आहोत, असेगी फडणवीस यांनी म्हटले.

### राज्यात भाजच्या १३ जागा घटल्या

**लोकसभा निवडणुकीत राज्यात महायुतीला केवळ १७ जागांवर विजय मिळाला. गत २०१९ च्या तुलनेत युतीच्या २५ जागा यंदा कमी झाल्या. तर, भाजपला केवळ ९ जागांवर विजय मिळाला असून २०१९ च्या तुलनेत भाजपच्या १३ जागा कमी झाल्या आहेत. त्यामुळे, भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने मोठी नाराजी व्यक्त केली असून राज्यातील नेत्यांना काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. महाविकास आघाडीकडून जो नेरेटीव्ह सेट करण्यात आला, तसेच मराठा आरक्षण, संविधान बदलणार, कांदाप्रश्न हेही मुद्दे प्रकर्षणाने या निवडणुकीत समोर आल्याचं दिसून आलं. त्याला सोशल मीडियातून प्रभावीपणे उत्तर देण्यात महाराष्ट्र भाजप कमी पडल्याची जाणीवही भाजप नेत्यांना करुन देण्यात आली आहे.**